# सेवार्थ प्रणालीतून वेतन देयके संस्करीत करण्याबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००७/प्र. क्र.११२/भाग-१/कोषा प्रशा ५, दिनांक २१/०९/२०१२
२) शासन परिपत्रक क्रमांक संलेको-२०१४/सेवार्थ/नस्ती क्र. ६/४१८, दिनांक ३०/०८/२०१४

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सेवार्थ प्रणालीतून वेतन देयके सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदर सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी सेवार्थ प्रणालीतून देयके संस्करीत करीत आहेत. परंतु असे निदर्शनास आले आहे की, देयके संस्करीत (Process) करताना बऱ्याच अडचणी निर्माण होत आहेत.

सदर अडचणी दूर करण्यासाठी, सेवार्थ प्रणालीच्या गतीमध्ये वाढ होण्यासाठी व सुरळीतपणे चालू राहण्यासाठी, विभागनिहाय तसेच दिनांकनिहाय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकरीता प्रणालीतून **वेतन देयके संस्करीत (Process) करण्याकरीता** खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आलेली आहे.

| विभागाचे नाव | देयके Process करण्यासाठी नेमून दिलेले दिनांक |
|---|---|
| **मुंबई** | **२१ ते २४** |
| **नाशिक व कोकण** | **२५ ते २७** |
| **पूणे** | **१९ ते २०** |
| **औरंगाबाद** | **१७ ते १८** |
| **नागपूर व अमरावती** | **१४ ते १६** |

नेमून दिलेल्या दिनांकासच संबंधित विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करुन वेतन देयके संस्करीत करावयाची आहेत. दिनांक १४ ते दिनांक २७ या कालावधीत ज्या विभागाकरीता दिनांक नेमून दिलेले आहेत त्या दिनांकासच त्यांची वेतन देयके संस्करीत होणार आहेत. या कालावधीत अन्य दिनांकास प्रयत्न केल्यास त्यांची वेतन देयके संस्करीत होणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर व्यवस्था फक्त वेतन देयके संस्करीत करण्यासाठीच करण्यात आलेली आहे, आहरण व संवितरण अधिकारी पूर्ण महिन्यातील कोणत्याही दिनांकास वेतन देयके संस्करीत करण्यापूर्वीचे कामकाज करु शकतात केवळ उपरोक्त दिनांकाच्या कालावधीत वेतन देयके संस्करीत होतील. उपरोक्त दिनांकाच्या कालावधीत सर्वच्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून एकाच वेळी प्रणालीचा वापर होत असल्याने प्रणालीवर ताण येऊन प्रणालीचा वेग मंदावला जातो त्यामुळे सदर व्यवस्था करण्यात आलेली आहे.

उपरोक्त वेळापत्रकाच्या व्यतिरिक्त दिनांक २७ ते पुढील महिन्याच्या दिनांक १३ या कालावधीत सेवार्थ प्रणाली सर्वांसाठी सर्व कामकाजासाठी उपलब्ध आहे. परंतु या कालावधीत जर सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रणालीचा वापर एकाच वेळी केला तर त्याचा वेग मंदावला जाऊ शकतो याची नोंद घ्यावी.

तरी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी उपरोक्त वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

# परिपत्रक

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००७/प्र. क्र.११२/भाग-१/कोषा प्रशा ५, दिनांक २१/०९/२०१२
२) शासन परिपत्रक क्रमांक संलेको-२०१४/सेवार्थ/नस्ती क्र. ६/४१८, दिनांक ३०/०८/२०१४

सेवार्थ प्रणालीवर प्रचंड ताण वाढलेला आहे. परिणामी अनेक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची वेतन देयके संस्करीत करण्याचे काम संथ गतीने सुरु आहे. सेवार्थ प्रणालीच्या गतीमध्ये वाढ होण्यासाठी व सुरळीतपणे चालू राहण्यासाठी, महसूल विभागनिहाय तसेच दिनांकनिहाय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकरीता प्रणालीतून वेतन देयके संस्करीत (Process) करण्याकरीता शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००७/प्र. क्र.११२/भाग-१/कोषा प्रशा ५, दिनांक २१/०९/२०१२ अन्वये खालील तक्त्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आलेली होती.

| विभागाचे नाव | देयके Process करण्यासाठी नेमून दिलेले दिनांक |
|---|---|
| मुंबई | २१ ते २४ |
| नाशिक व कोकण | २५ ते २७ |
| पूणे | १९ ते २० |
| औरंगाबाद | १७ ते १८ |
| नागपूर व अमरावती | १४ ते १६ |

जेणेकरुन संबंधित विभाग निर्देशित दिनांकामध्ये विनासायास सेवार्थ प्रणालीचा वापर करू शकतात व सेवार्थ प्रणालीवरील ताण वितरीत होऊन ती अखंडित चालू राहण्यास मदत होईल.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, संबंधित विभाग विहित तारखांमध्ये/वेळापत्रकानुसार वेतन देयके तयार करीत नाहीत व उपरोक्त वेळापत्रकानंतर महिन्याच्या अंतिम तीन दिवसांत एकाच वेळेस Login करुन सेवार्थ प्रणालीतून वेतन देयके संस्करीत करण्याचा प्रयत्न करतात परिणामी सेवार्थ प्रणालीवरील ताण वाढून प्रणाली सुरळीतपणे चालू शकत नाही.

तरी याव्दारे सर्व विभागांना पुन्हा सूचित करण्यात येते की, त्यांनी नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार सेवार्थ प्रणालीतून वेतन देयके संस्करीत करण्याची कार्यवाही करावी.